|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र. उमवि/१४/ वि.वि. /दत्तक योजना / १० /२०२६ दि. १९/०१/२०२६

**प्रति,**
**मा. संचालक/ विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी,**
**विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग यांना ...**

**विषय :- विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग विद्यार्थी दत्तक योजनेबाबत ...**

महोदय/महोदया,

विद्यापीठ परिसरातील विविध शैक्षणिक प्रशाळा - विभागात शिक्षण घेणारे गरजू व होतकरु विद्यार्थी कमकुवत आर्थिक परिस्थितीमुळे पदवी/ पदव्युत्तर शिक्षणापासून वंचित राहू नये याकरीता विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग **विद्यार्थी दत्तक योजना** विद्यार्थी विकास विभागामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. योजनेतंर्गत प्रत्येक प्रशाळा- विभाग यांचेतील विषय अभ्यासक्रमनिहाय एक विद्यार्थी व एक विद्यार्थिनींना योजना समितीच्या शिफारसीनुसार मा.कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने आर्थिक सहाय्य दिले जात असते.

आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2025-26 करीता **विद्यार्थी दत्तक योजनेचा** लाभ आपल्याकडील गरजू विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी सदर पत्रकातील नियमांच्या अधिन राहून विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

१) या योजनेसाठी अर्ज करू इच्छिणारा विद्यार्थी हा विद्यापीठ परिसरातील शैक्षणिक प्रशाळा -विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नियमित शिक्षण घेणारा असावा.

२) या योजनेचा लाभ घेणास पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांने मागील परीक्षेत ६०% पेक्षा अधिक गुण असणे आवश्यक आहे. जर आपल्याकडे SGPA/ CGPA/ Grade अशी गुण पध्दत असली तरी त्या विद्यार्थ्यांचे गुण हे ६०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण आहेत असा अभिप्राय द्यावा अन्यथा अर्ज बाद होईल.

३) प्रस्तुत योजनेच्या लाभासाठी अर्ज करतांना विद्यार्थ्यांने तो आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब असल्याचा स्पष्ट पुरावा म्हणून नायब तहसीलदार/ तहसीलदार यांचेकडील उत्पन्न दाखला जोडणे आवश्यक राहील.

**४) विद्यापीठाच्या दुस-या कोणत्याही योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ देण्यात येवू नये.**

५) या योजनेंतर्गत पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्याकडून निवास, भोजन, वह्या पुस्तके, शैक्षणिक साहित्य तसेच त्याच्या मुळ गावी जाण्या-येण्याचा दोन वेळचा प्रवास खर्च इ. अंदाजपत्रक मागवावे.

उमवि विद्यार्थी दत्तक योजना समितीच्या निर्णयानुसार पात्र लाभार्थीना एकत्रितपणे विद्याशाखेनुसार आर्थिक सहाय्य रक्कम मा. कुलगुरु महोदयांच्या निर्देशानुसार अदा करण्यात येईल.

| अ.क्र. | विद्याशाखेनिहाय तपशील | आर्थिक सहाय्य |
|---|---|---|
| ०१. | पदवीपर्यंत- | रु.१०,०००/- |
| ०२. | पदव्युत्तर (कला, वाणिज्य, व्यवस्थापन शास्त्र व शिक्षणशास्त्र) | रू.१२,०००/- |
| ०३. | पदव्युत्तर (विज्ञान व अभियांत्रिकी/ तंत्रज्ञान) | रू.१५,०००/- |

प्रस्तुत योजनेच्या आर्थिक सहाय्य रकमेत बदल/ सुधारणा करण्याचा अधिकार मा. कुलगुरु महोदय यांचा राहील.

६) या योजनेचा लाभासाठी विद्यार्थ्याने अर्ज केल्यावर त्याचा प्रवेश व्यवस्थापन कोटा किंवा उद्योग प्रोत्साहन कोटा (सीट) किंवा स्वायत्त (Autonomus) अभ्यासक्रमामध्ये झालेला नाही याची खातरजमा करावी. याचे पालन न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विषय प्रमुख, विभागप्रमुख व संचालक याची राहील.

७) प्रस्तुत याजनेसाठी विद्यार्थी अर्जांची छाननी करतांना योग्य विद्यार्थी निवडण्यासाठी प्रथमत: अनाथ/ अंत्योदय कार्डधारक/ दारिद्रय रेषा कार्डधारक (BPL)/ स्वयंग दिव्यांग (अपंग)/ शेतकरी कुटुंबातील आत्महत्याग्रस्त यांचे मुलगा-मुलगी/ आई-वडील मयत/ मागासवर्गीय अशा विद्यार्थ्यांना निवड करतांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच अर्जदार व आई/वडील/ पालक यांचे सर्व मार्गाने मिळून सन २०२४-२५ चे वार्षिक उत्पन्न रु. ७५,०००/- पेक्षा जास्तीचे नसावे. या पत्रकातील नमूद अटी आणि पात्रता पुर्ण करीत असलेल्या विद्यार्थ्यांचे नावे आपल्या शिफारशीसह पाठविण्यात यावे.

८) शैक्षणिक प्रशाळा-विभाग संचालक/विभाग प्रमुख यांनी त्यांच्या विभागात प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन त्यातील विषय अभ्यासक्रम निहाय अत्यंत गरीब व गरजू असलेल्या किमान १ विद्यार्थी व १ विद्यार्थिनी (एकुण - २) यांची नावे शिफारस करुन विद्यार्थी विकास विभागाकडे पाठवावेत. योजनेकरीता अर्ज शैक्षणिक वर्षाकरीता आपल्याकडे ठेवावेत.

९) सदर योजना ही विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळा-विभागातील केवळ विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्याकरीताच असल्याने प्राप्त झालेल्या नावातून अटी व नियमांच्या आधारे पात्र विद्यार्थ्यांची योजनेचा लाभासाठी शिफारस करण्याचा अधिकार कबचौउमवि विद्यार्थी दत्तक योजना समितीचा आहे. त्यास अंतिम मान्यता मा. कुलगुरु महोदय यांची राहील.

१०) प्रस्तुत योजनेचा लाभ घेणारा विद्यार्थी / विद्यार्थीनी हा/ ही विद्यापीठ वसतिगृहात निवासी असेल व वसतिगृहाचे नियम न पाळणे, गैरवर्तन करणे, रॅगिंगमध्ये सहभागी होणे, माहितीमध्ये विपर्यास, प्रवेश रद्द होणे आदी बाबतीत जर तो/ ती दोषी आढळून आला / आली तर त्याचे /तीचे नाव दिलेली लाभाची रक्कम वसूल करण्यात येईल व इतर कोणत्याही योजनेतील त्याचा/ तिचा सहभाग रद्द करण्यात येईल.

पत्रकातील नियमावलीस अनुसरुन पात्र विद्यार्थ्याचे अर्ज, सहपत्रकासह दि. ३१/०१/२०२६ पर्यत विभाग/ प्रशाळा यांच्या संचालक/ विभागप्रमुख/ नियंत्रक अधिकारी यांचे कार्यालयाकडे सादर करावीत. तद्नंतर मा. संचालक/ विभागप्रमुख / नियंत्रक यांनी प्राप्त अर्जाची छाननी करुन त्यातील विषय अभ्यासक्रम निहाय अत्यंत गरीब व गरजू **१ विद्यार्थी व १ विद्यार्थिनी** असे एकूण २ नावे **दि. ०३/०२/२०२६** पर्यंत **कार्यालयीन वेळेत सोबत जोडलेल्या नमुन्यात विहीत माहिती नमूद करुन विद्यार्थी विकास विभागात पाठवावेत**, ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

19-1-2026

**(डॉ. जयेंद्र दि. लेकुरवाळे)**
संचालक, विद्यार्थी विकास

**सोबत :-** विहित नमून्यातील अर्ज व शिफारस पत्र नमूना

**प्रत माहितीसाठी :-**

१) डॉ. सी.टी. आगे, कबचौउमवि शैक्षणिक प्रशाळा- विभाग, कबचौउमवि, जळगाव
२) मा. कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
३) मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
४) मा. वित्त व लेखा अधिकारी कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.

# विद्यार्थी दत्तक योजना
## विहीत अर्ज - (वर्ष २०२५-२६)

अलिकडील फोटो

## विभाग - अ : वैयक्तीक माहिती :-

१. नांव :- ............

२. प्रशाळा /विभागाचे नाव :- ............

३. शिकत असलेला वर्ग/अभ्यासक्रम :- ............
(अनुदानीत/ स्वयंनिर्वाह तसेच व्यवस्थापन कोटा/ उद्योग प्रोत्साहन कोटा (सीट) )

४. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ............
(पिन कोड क्र.सह) :- ............

५. दूरध्वनी क्रमांक (१) :- ............
(एस.टी.डी. कोडसह)(२) :- ............
भ्रमणध्वनी क्रमांक

६. पत्ता (E-mail) :- ............

७. लिंग :- पुरुष ☐ स्त्री ☐

८. जन्म दिनांक :- ☐☐ ☐☐ ☐☐☐☐
दिनांक महिना वर्ष

९. अनाथ :- ☐ होय ☐ नाही
(असल्यास प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेला प्रमाणपत्राची छायांकित प्रत सादर करावी)

१०. शारीरिक किंवा sensory दिव्यांग (अपंग) आहात काय?:- ☐ होय ☐ नाही
असल्यास नमूद करावे ............

१०. प्रवर्ग व जात :- खुला/ अनुसचित जाती/ जमाती/भटके विमुक्त जाती जमाती
:- विशेष मागासवर्गीय/ इतर मागासवर्गीय/अल्पसंख्याक/ इतर...............

११. दारीद्रय रेषा कार्डधारक (BPL) ............

१२ बॅकेचे नाव व पत्ता :- ............................................................

खाते क्रमांक :- आय.एफ.एस.सी. क्रमांक :- बॅक लिंक मो.क्र.:-

## विभाग-ब : शैक्षणिक व इतर माहिती :

१. मागील वर्षी पास झालेली परीक्षा :- ............

२. मागील वर्षी वार्षिक परीक्षेत मिळालेले गुण व टक्के:- ............
(SGPA/CGPA/Grade/%, किमान ६० % पेक्षा कमी गुण असल्यास अपात्र)

३. इ.१२ वी उत्तीर्ण झाल्याचे वर्ष व गुण :- वर्ष गुण %

४. एन.सी.सी., एन.एस.एस.,क्रीडा, सांस्कृतिक उपक्रमात भाग घेतला आहे काय? :- होय /नाही

५. कमवा व शिका योजनेत सहभाग घेतला आहे काय ? :- ☐ होय ☐ नाही

असल्यास यादीतील क्रमांक :- ☐

६. आर्थिक मदतीची गरज का ? :- ..................................................

..................................................

७. आर्थिक मदतीचा विनियोग कसा कराल ? :- ..................................................

..................................................

८. मागील वर्षी विद्यापीठाकडून आर्थिक मदत मिळाली होती का ? :- ..................................................
मिळालेली असल्यास किती रुपये :- ..................................................

९. राज्य/ केंद्र शासन/ निमशासकीय यांच्या कोणत्या शिष्यवृत्तीचा लाभ घेता ? तपशील द्यावा. :-

..................................................

१०. मागील वर्षी मिळालेली शिष्यवृत्तीची रक्कम किती ? :- ..................................................

११. आपले शिक्षण पूर्ण झाल्यावर आपण इतर गरजू विद्यार्थ्यांना काय मदत कराल ?

..................................................

..................................................

मी नमूद करतो / करते की, वर दिलेली सर्व माहिती योग्य असुन. पुष्टीकरिता आवश्यक दस्ताऐवजांचा छायांकित प्रति अर्जा सोबत जोडत आहे .सदर माहिती / दस्तऐवजामध्ये चुक आढळल्यास मला मिळालेले अर्थसहाय्य विद्यापीठास सत्वर परत करेलअशी हमी देतो/देते. या बाबत विद्यापीठा मार्फत कोणताही निर्णय झाल्यास तो माझ्यावर बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.

............................
(विद्यार्थी/ विद्यार्थिनीची स्वाक्षरी )

दिनांक : / /२०२६

..................................................

विद्यार्थी विकास अधिकारी यांची शिफारस व सही

प्रमाणित करण्यात येते की , .............................................. हा/ ही ................................ शैक्षणिक वर्ष- २०२५-२६ करीता .......................वर्गामध्ये ............................... विषयासाठी नियमित विद्यार्थी म्हणुन आमच्या प्रशाळा- विभागात प्रवेशीत आहे .

दिनांक :- / /२०२६

मा.प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख/ नियंत्रक अधिकारी
यांची सही व शिक्का

## विभाग- क : कौटुंबीक व उत्पन्न माहिती :-

१. वडीलाचे नाव व पूर्ण :- ..........

पत्ता (पिन कोड क्र.सह) :- ..........

दुरध्वनी क्रमांक :- ..........

२. वडीलाचे शिक्षण :- ..........

३. वडीलाचे व्यवसाय :- ..........

४. वडीलाचे वार्षिक उत्पन्न :- ..........

५. आईचे नाव, पत्ता व व्यवसाय :- ..........

६. आईचे शिक्षण :- ..........

७. आईचा व्यवसाय :- ..........

८. आईचे वार्षिक उत्पन्न :- ..........

९. पालक/ घरातील अन्य व्यक्ति / भाऊ/ बहिण नाव व पत्ता :- ..........

१०. पालक/घरातील अन्य व्यक्तिंचा व्यवसाय :- ..........

११. पालक/ घरातील अन्य व्यक्तिंचे वार्षिक उत्पन्न :- ..........

१२. कुटूंब दारीद्रय रेषेखालील कार्डधारक (BPL) :- ..........

..............................................मी व माझ्या मुलगा/ मुलगी/ पाल्य याने/ हीने प्रस्तुत अर्जातील माहिती व उत्पन्न विषयक नमुद निवेदन संपूर्णपणे बरोबर असून, जर सदर माहिती अंशतः/पूर्णतः चुकीची /असत्य/ विपर्यस्त असल्याचे सिध्द झाल्यास त्याबाबत मी व्यक्तिशः जबाबदार राहीन व माझ्या मुलास/ मुलीस/ पाल्यास सदर योजने अंतर्गत मंजूर/प्राप्त आर्थिक सहाय्याची रक्कम विद्यापीठास परत करण्याची हमी देत आहे याबाबत विद्यापीठाने कोणताही निर्णय घेतल्यास तो माझ्यावर अंतिमतः बंधनकारक राहील .

दिनांक-

ठिकाण-

( )

आई/वडील/पालक यांचे नाव व स्वाक्षरी

**अर्जासोबत जोडावयाची (छायांकीत) कागदपत्रे -**

१) मागील वर्षी पास झालेल्या परीक्षेचे गुणपत्रक.

२) वडील /आई/ पालक यांचा नायब तहसिलदार/ तहसिलदार यांनी दिलेला सन २०२४-२५ चा उत्पन्न दाखला

३) अर्जदार अनाथ असल्यास तसे प्राधिकृत अधिका-याने दिलेले अनाथ प्रमाणपत्र.

४) अर्जदार स्वतः दिव्यांग (अपंग) असल्यास तसे प्रमाणपत्र

५) अंत्योदय कार्ड/ दारीद्र रेषा कार्ड (BPL) प्रत

६) वडील / आई मृत्यु झाला असल्यास त्यांचा मृत्यू दाखला.

७) जातीचे प्रमाणपत्र.

८) बॅक पासबुक प्रत.

कृपया, सदरचे पत्र आपल्या प्रशाळा- विभागाच्या मुखपृष्ठावर (लेटर हेड) तयार करावे.

-----------------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. कबचौउमवि/ /प्र-वि/ /२०२६ दि. / /२०२६

प्रति,
**मा. संचालक,**
**विद्यार्थी विकास विभाग,**
**कबचौउमवि, जळगाव**

**विषय :- विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग विद्यार्थी दत्तक योजनेबाबत..**
**संदर्भ :- आपले पत्र क्र. कबचौउमवि/१४/विवि/ १० /२०२६, दि. १९/०१/२०२६**

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये **विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग विद्यार्थी दत्तक योजना** अंतर्गत आमच्या प्रशाळा/ विभागात -------------------------------------- विषयाअंतर्गत --------------------- विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचेकडून अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी अत्यंत गरीब व गरजू एक विद्यार्थी व एक विद्यार्थीनी यांचे नावे निवडतांना संदर्भिय पत्रकातील अटी व शर्तीचे पालन करण्यात आले आहे. अशा विद्यार्थ्यांची माहिती खालीलप्रमाणे आपणाकडे सादर करीत आहोत.

| Name | Gender | Category | Class | Subject | Marks and % | Annual Income | Bank Name | Account No. | IFSC Code | Bank Link Mobile No. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | |

आमच्या प्रशाळा- विभागातील उपरोक्त विषयाचे नमूद दोन्ही विद्यार्थ्यांची SGPA/ CGPA/ Grade गुणवत्ता नमूद असलीतरी सदर विद्यार्थी ६० % किंवा त्यापेक्षा जास्त गुणवत्ताधारक आहेत अशी हमी देतो. या माहितीन्वये विद्यार्थ्याची **विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग विद्यार्थी दत्तक योजने**च्या लाभासाठी शिफारस करीत आहोत. संबंधित शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीमध्ये विपर्यास किंवा असत्यता आढळल्यास किंवा प्रवेश रद्द केल्यास अर्थसहाय्य म्हणून दिलेली रक्कम विद्यार्थ्याकडून वसूल करु, व विद्यापीठ खाती जमा करण्याची आम्ही ग्वाही देतो.

तरी पत्रात नमूद विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचा विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा- विभाग विद्यार्थी दत्तक योजने मध्ये समावेश करावा.

कळावे.

विभागप्रमुख

संचालक/ विभाग
(सही व शिक्का)